जनसंपर्क कक्ष
2 JAN 2019 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना आदरांजली

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली.

पुण्यतिथीनिमित्त डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीतर्फे शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांचे 'डॉ. आप्पासाहेब पवार कार्य व कर्तृत्व' या विषयावर व्याख्यान झाले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रबोधिनीचे उपाध्यक्ष व माजी बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. बी. एल. पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळप्रमुख ए. एम. गुरव, प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष प्राचार्य एस. जे. नाईक, सचिव टी. के. सरगर, कार्यकारिणी सदस्य अशोकराव जगताप, मानसिंगराव जगताप, किसन कुराडे, सी. टी. पवार, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, अधीक्षक एस. डी. शिंदे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत अन्य.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत शेती व पशुसंवर्धन शाखेतून द्वितीय क्रमांक पटकाविलेल्या प्रा. बाबूराव घुरके यांना बक्षीस देताना डॉ. तुषार चांदवडकर. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. एम. गुरव.

# आविष्कार संशोधन स्पर्धेत प्रा. बाबूराव घुरके यांचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित तेराव्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमधील भूगोल विभागातील प्रा. बी. बी. घुरके यांनी शेती व पशुसंवर्धन या शाखेतून द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिमेकडील डोंगराळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीची पोस्टरद्वारे मांडणी केली. गेल्या वर्षी नगर येथे राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली होती. या वर्षीही त्यांची गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना प्रा. डॉ. आर. व्ही. हजारे व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Kolhapur-Today
02/01/2019 Page No. 7

लोकमत

# ‘दूरशिक्षण’च्या चार अभ्यासक्रमांना मान्यता

## युजीसीचा निर्णय; शिवाजी विद्यापीठाकडून त्रुटींची पूर्तता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : त्रुटींची पूर्तता केल्याने शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या चार अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मान्यता दिली आहे. या अभ्यासक्रमात एम. एस्सी. मॅथेमेटिक्स्, एम. ए. इंग्लिश, अर्थशास्त्र, एम. कॉम. (व्हॅल्यूएशन ऑफ रियल इस्टेट) यांचा समावेश आहे.

युजीसीकडून दूर शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांना मान्यता मिळविण्यासाठी विविध अटींची पूर्तता करावी लागते. विद्यापीठाने या केंद्रातील १३ अभ्यासक्रमांबाबतच्या अटींची पूर्तता केली नसल्याने या अभ्यासक्रमांची मान्यता यूजीसीने ऑगस्टमध्ये रद्द केली होती. संबंधित अटींची पूर्तता केल्यानंतर यूजीसीने पहिल्या टप्प्यांत १३ पैकी नऊ अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली. त्यामुळे दूरशिक्षण केंद्रांतील एम. ए., एम. कॉम., एमबीए आणि बी. कॉम., आदी विषयांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर एम. एस्सी. मॅथेमेटिक्स्, एम. ए. इंग्लिश, अर्थशास्त्र, एम. कॉम. (व्हॅल्यूएशन ऑफ रियल इस्टेट) यांच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव यूजीसीला पाठविण्याची प्रक्रिया विद्यापीठाने सुरू केली. हा प्रस्ताव वेळेत सादर केल्याने या अभ्यासक्रमांना सोमवारी (दि. ३१ डिसेंबर) मान्यता मिळाली आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रतीक्षेतील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला.

> **“ यूजीसीने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटींची पूर्तता विद्यापीठाकडून वेळेत करण्यात आली; त्यामुळे आता दूरशिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे. त्याचा आनंद होत आहे. यूजीसीने दिलेली ही मान्यता दोन वर्षांसाठी असणार आहे.**
>
> **- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 JAN 2019

तरुण भारत

# दिव्यांग हक्क कायद्यावर विद्यापीठात शुक्रवारी कार्यशाळा



**कोल्हापूर :** बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र- समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यु.जी.सी. स्कीम फॉर पर्सन विथ डिसेबल आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमानाने शुक्रवार दि. ४ रोजी 'जागतिक ब्रेल दिवस' विद्यापीठामध्ये साजरा करण्यात येणार आहे. तसेच 'दिव्यांग हक्क कायदा २०१६' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. प्रमुख पाहुणे म्हणून हेल्पर्स ऑफ दी हॅन्डीकॅपच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे भूषविणार आहेत. तरी जास्तीत जास्त दिव्यांग बंधू-भगिनींनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांतर्फे केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 JAN 2019

पुण्यनगरी

# विद्यापीठात ४ रोजी जागतिक ब्रेल दिवस

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन विथ डिसेबल आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ जानेवारी रोजी विद्यापीठात 'जागतिक ब्रेल दिवस' साजरा करण्यात येणार आहे. सदर दिवशी 'दिव्यांग हक्क कायदा २०१६' या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सकाळी १०.३० वाजता सिनेट हॉल येथे ही कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हेल्पर्स ऑफ दी हन्डीकॅपच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यशाळेत नसीमा हुरजूक आणि सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इन्क्लुझिव्ह एज्युकेशन आणि अक्सेसाबिलिटीचे समन्वयक धनंजय भोले 'दिव्यांग हक्क कायदा २०१६' या विषयावर प्रात्यक्षिकासह मांडणी करणार आहेत, अशी माहिती संयोजक डॉ. नमिता खोत, डॉ. नंदा पारेकर आणि डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली आहे.

सकाळ

# विद्यापीठात आज एकदिवसीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन आणि एन. डी. पाटील प्रतिष्ठानतर्फे उद्या (ता. २) शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभाग सभागृहात 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न - संशोधन आणि कार्य ' याविषयावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. चर्चासत्राचे सकाळी १०.३० वाजता डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन तर डॉ. गोपाळ गुरू यांचे बीजभाषण होईल. अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील आहेत. पहिल्या सत्रात भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न - व्याप्ती आणि पद्धतिशास्त्र याविषयावर डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. भारत पाटणकर यांचे भाषण आहे. अध्यक्षस्थानी डॉ. टी. एस. पाटील आहेत. दुसऱ्या सत्रात 'महर्षी शिंदे यांचे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य' यावर डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे विशेष व्याख्यान तर डॉ. अशोक चौसाळकर यांच्या उपस्थित चर्चासत्राचा समारोप होईल. उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख प्रा. राजन गवस, रणधीर शिंदे यांनी केले आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
02/01/2019 Page No. 7